**महावितरण**

(महाराष्ट्र शासन-अंगीकृत उपक्रम)

CIN = U40109MH2005SGC153645

☎: २६४७४२११, २६४७२१३१
Email: amppacell@mahadiscom.in
website: www.mahadiscom.in

संपादणूक मूल्यांकन कक्ष,
प्लॉट नं. जी- ९, प्रकाशगड,
अनंत काणेकर मार्ग, स्टेशन रोड,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१.

---

संदर्भ : मासं/संमुक/ 21951 दिनांक : 17.09.2021

प्रति,
मुख्य अभियंता (वितरण),
सर्व परिमंडळ कार्यालय, म.रा.वि.वि.कं.मर्या.,

**विषय:** राज्यसेवाजेष्ठते अंतर्गत येणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे सन २०२०-२०२१ या वर्षाचे गोपनीय अहवाल अद्यापही प्रतिवेदिंत, पुनर्विलोकन, प्रतिस्वाक्षरी व स्वीकृत न झाल्याबाबत.

**संदर्भ :** १. HR/PACell/PMS/ACR२०२०-२०२१/५३९२ दि.०४.०३.२०२१.

*****

उपरोक्त विषयास अनुसरुन, सन २०२०-२०२१ या वर्षाचे गोपनीय अहवाल ऑनलाईन पद्धतीने प्रतिवेदित, पुर्नविलोकन, प्रतिस्वाक्षरी व स्वीकृत करण्याच्या सूचना संदर्भिय परिपत्रकानुसार देण्यात आलेल्या होत्या. परंतु कर्मचारी प्रणालीमार्फत प्रलंबित गोपनीय अहवालाचे (Reports) अवलोकन केले असता आपल्या परिमंडळांतर्गत कार्यरत असणा-या सक्षम अधिका-यांनी अद्यापपर्यंत सन २०२०-२०२१ या वर्षाचे गोपनीय अहवाल प्रतिवेदित, पुर्नविलोकन, प्रतिस्वाक्षरी व स्वीकृती केलेले नसल्याचे निदर्शनास आलेले आहे.

२. तसेच सन २०२०-२०२१ या वर्षाचे गोपनीय अहवाल दि.३०.०८.२०२१ पर्यंत पूर्ण करण्याच्या सूचना संदर्भिय पत्रा नुसार देण्यात आलेल्या होत्या. परंतु अद्यापही गोपनीय अहवाल संबंधित प्रतिवेदित / पुर्नविलोकन / प्रतिस्वाक्षरी व स्वीकृती अधिकारी यांच्याकडे मोठया संख्येने प्रलंबित असल्याचे दिसून येते. त्यामुळे कर्मचारी/अधिकारी यांना सामान्य आदेश ७४(पी) /१११(पी) व आगामी पदोन्नती प्रक्रियेमध्ये अडचणी निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

३. सबब, आपणास या पत्राद्वारे सूचित करण्यात येते की, आपल्या अधिपत्याखालील मंडळ व विभागीय कार्यालयास **सन २०२०-२०२१** चे प्रलंबित गोपनीय अहवाल ऑनलाईन प्रतिवेदित, पुर्नविलोकन, प्रतिस्वाक्षरी व स्वीकृती करण्यासंबंधित तसेच ज्या कर्मचा-यांचे गोपनीय अहवाल लिहणा-या संबंधित अधिका-यांची नावे मानव संसाधन प्रणालीमध्ये अद्ययावत करण्याचे प्रलंबित असल्यास त्याबाबतच्या सूचना आपल्या स्तरावर देण्यात याव्यात व सन २०२०-२०२१ वर्षाचा गोपनीय अहवाल **दि.३०.०९.२०२१** पूर्वी सादर होतील, याची दक्षता घ्यावी.

(अ. म. भादीकर)
**कार्यकारी संचालक(मासं)**

**प्रत सविनय सादर :-**

१) संचालक (वित्त/संचलन/वाणिज्य/प्रकल्प /मासं), म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई.
२) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या., प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद/ कल्याण.

**प्रत सस्नेह रवाना :-**

१) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या., प्रादेशिक कार्यालय, पुणे, नागपूर.
२) कार्यकारी संचालक (सुवअं/वित्त/देयके व महसूल), म.रा.वि.वि.कं.मर्या., प्रकाशगड, मुंबई.

**प्रत रवाना :-**

१) सर्व विभाग प्रमुख, म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई.
- आपल्या अधिपत्याखालील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना सन २०२०-२०२१ या कालावधीमधील प्रलंबित असलेले गोपनीय अहवाल दि. ३०.०९.२०२१ तदपूर्वी पूर्ण करण्याच्या सूचना आपल्या स्तरावर देण्यात याव्यात.

२) मा. अध्यक्ष व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्याधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या., प्रकाशगड, मुंबई.

Scanned with CamScanner